मराठी अर्थशास्त्र परिषद

# घटना

सुधारित - २०१५

मराठी अर्थशास्त्र परिषद ★ रजि. 4615 ★

डॉ.मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार
मराठी अर्थशास्त्र परिषद

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## घटना

## (विभाग १ : संस्थापन समयलेख)

## (Memorandum of Association)

**कलम १: परिषदेचे नाव व स्वरूप**

परिषदेचे नाव **''मराठी अर्थशास्त्र परिषद''** असे राहील. यापुढील कलमात तिचा उल्लेख ''परिषद'' असा केला आहे.

सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अन्वये परिषद निगम निकाय (Corporate Body) म्हणून आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये सार्वजनिक न्यास (Public Trust) म्हणून नोंदविण्यात येईल.

**कलम २: परिषदेचे कार्यालय**

परिषदेचे कार्यालय महाराष्ट्र राज्यात कार्यकारी मंडळ ठरवील तेथे राहील.

**कलम ३: उद्देश**

परिषदेचा मुख्य उद्देश अर्थशास्त्राविषयी मराठी भाषेतून अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि प्रबोधन यांना चालना देणे हा असेल.

**परिषदेची आनुषंगिक उद्दिष्टे खालीलप्रमाणे असतील -**

१) अर्थशास्त्रविषयक शास्त्रीय दृष्टिकोन व विचार मराठीतून प्रसृत करणे.

२) अर्थशास्त्रीय विचार व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा समृद्ध करणे.

३) प्रामुख्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्यांसंबंधी आणि त्यांच्या संदर्भात महाराष्ट्राच्या आर्थिक प्रश्नासंबंधी विवेचन व प्रबोधन करणे.

४) वरील उद्देशांशी सुसंगत व पोषक असे अन्य कोणतेही कार्य करणे.

**कलम ४: परिषदेचे उद्देश साधण्यासाठी मुख्यतः खालील साधनांचा अवलंब केला जाईल-**

१) व्याख्याने व चर्चा घडवून आणणे.

२) नियतकालिके काढणे व ग्रंथनिर्मिती करणे.

३) वाचनालये, ग्रंथसंग्रह, सहली, भेटी, शिबिरे, चर्चासत्रे, परिसंवाद अशांसारखे कार्यक्रम हाती घेणे.

४) ठिकठिकाणी मराठी अर्थशास्त्रविषयक सभासंमेलनांचे व अधिवेशनांचे आयोजन करणे.

५) अनुदाने, शिष्यवृत्या, पारितोषिके इत्यादींद्वारा अर्थविषयक संशोधन, अध्ययन,अध्यापन, ग्रंथनिर्मिती यांना प्रोत्साहन देणे.

६) परिषदेच्या उद्देशाशी सुसंगत व पोषक असे अन्य कार्यक्रम हाती घेणे.
परिषद आपले कार्यक्रम पार पाडतांना जातपात, धर्म, पंथ, लिंग यासारखा व अन्य कोणताही भेदभाव करणार नाही.

## विभाग २ : कामकाजाचे नियम व विनियम

## (Rules and Regulations)

**कलम १: परिषदेचे वर्ष इतिवृत्त, अहवाल व हिशेबासाठी १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.**

**कलम २: सदस्यत्व**

परिषदेची उद्दिष्टे व घटना मान्य असणाऱ्या कोणाही अठरा वर्षावरील व्यक्तीला वा संस्थेला परिषदेचे सदस्य होता येईल.

**परिषदेच्या सदस्यांचे प्रकार खालील प्रमाणे राहतील.**

अ) आजीव सदस्य

ब) साधारण सदस्य

क) संस्था सदस्य I) शैक्षणिक

II) व्यावसायिक

१) सदस्यत्वासाठी सदस्य होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला वा संस्थेला विहीत नमुन्यातील अर्ज संपूर्ण तपशिलासह व वर्गणीसहित कार्यकारी मंडळाकडे पाठवावा लागेल.

२) सदस्यत्वासाठी परिषदेकडे आलेल्या सर्व अर्जाचा विचार व अंतिम निर्णय कार्यकारी मंडळ करील.

३) सदस्यांनी द्यावयाच्या वार्षिक वर्गणीत किंवा ठोक रकमेत ( Lump-sum Amount) बदल करण्याचा अधिकार वार्षिक साधारण सभेला राहील.

४) नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा कार्यकाल पुढील वर्षाच्या १ एप्रिलपासून सुरू होईल.

**कलम ३: सदस्यांचे अधिकार पुढीलप्रमाणे असतील -**

१) परिषदेच्या साधारण सभांमध्ये भाग घेणे व मतदान करणे.

२) वार्षिक अधिवेशन व अन्य कार्यक्रमात नियमानुसार भाग घेणे.

३) परिषदेच्या निवडणुकीस नियमानुसार उभे राहणे व मत देणे.

अ) प्रत्येक संस्था सदस्यांतर्फे केवळ एक प्रतिनिधी साधारण सभेमध्ये भाग घेऊन मतदान करू शकेल. या प्रतिनिधीकडे संबंधित संस्थेचे प्रतिनिधीत्वाचे अधिकृत पत्र असले पाहिजे.

आ) संस्था सदस्यास निवडणुकीस उभे राहता येणार नाही.

**कलम ४: कार्यकारी मंडळ**

१) परिषदेचा कारभार कार्यकारी मंडळाकडे राहील.

२) कार्यकारी मंडळात पुढील प्रमाणे एकूण अठरा सदस्य असतील.

अ) वार्षिक साधारण सभेने निवडलेले अध्यक्ष : एक

ब) वार्षिक साधारण सभेने निवडलेले कार्याध्यक्ष : एक

क) वार्षिक साधारण सभेने निवडलेले कार्यवाह - खजिनदार : एक

ड) वार्षिक साधारण सभेने निवडलेले : अकरा सदस्य

परिषद अर्थशास्त्र ... २०१५

इ) कार्यकारी मंडळाने स्वीकृत केलेले : दोन सदस्य
कार्यकारी मंडळावर स्वीकृत सदस्यांची मुदत एक वर्ष राहील. त्याच सदस्यांना पुन्हा स्वीकृत करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

फ) अध्यक्षांनी नियुक्त केलेले स्थानिक कार्यवाह : एक

ग) प्रमुख संपादक नियतकालिक - पदसिद्ध : एक

३) परिषदेच्या अध्यक्षाची निवड दरवर्षी साधारणसभेत होईल. निवृत्त होणाऱ्या अध्यक्षीय व्यक्तीला अध्यक्षीय निवडणुकीस पुन्हा उभे राहता येणार नाही.

४) कार्यकारी मंडळाच्या सभेची गणसंख्या पाच राहील.
गणसंख्येची पूर्ती न झाल्यास तहकूब झालेली सभा पंधरा मिनिटांनी त्याच जागी होईल.अशा सभेला गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

**कलम ५:**

१) परिषदेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह - खजिनदार व स्थानिक कार्यवाह हे चौघे पदाधिकारी मानले जातील. त्यांची मुदत खालील प्रमाणे राहील -

| | | |
|---|---|---|
| अ) | अध्यक्ष | : एक वर्ष |
| ब) | कार्याध्यक्ष | : तीन वर्षे |
| क) | कार्यवाह- खजिनदार | : तीन वर्षे |
| ड) | स्थानिक कार्यवाह | : एक वर्ष |

२) कार्यकारी मंडळाच्या अन्य सदस्यांची मुदत तीन वर्षे राहील. दरवर्षी एकतृतीयांश सदस्य निवृत्त होतील. निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निवडणुकीस पुन्हा उभे राहता येईल.

३) परिषदेचे सर्व कायदेशीर व्यवहार अध्यक्षांच्या आणि /अथवा कार्यवाह-खजिनदारांच्या नावे व त्यांच्या सहीनुसार केले जातील.

४) नियमानुसार हिशेब ठेवण्याची व नियमानुसार खर्च होत आहे हे पाहण्याची जबाबदारी कार्यवाह- खजिनदारांवर राहील.

५) दैनंदिन खर्चाकरिता कार्यवाह- खजिनदारांना स्वत:जवळ जास्तीत जास्त रूपये एक हजार एवढी रक्कम ठेवता येईल.

**कलम ६: कार्यकारी मंडळाचे कार्य -**

परिषदेच्या सर्व कारभाराची जबाबदारी कार्यकारी मंडळावर संयुक्तपणे राहील. कार्यकारी मंडळाला पत्रव्यवहाराने निर्णय घेता येतील.

**कार्य -**

१) कार्यकारी मंडळावर नियमानुसार सदस्य स्वीकृत करणे.

२) सदस्यत्वाच्या अर्जावर निर्णय घेणे.

३) सदस्यांकडून आलेल्या सूचनांचा विचार करून त्यावर निर्णय घेणे.

४) घटनेत सुसंगत असे आवश्यक ते पोटनियम करणे व ते साधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवणे.

५) परिषदेची वार्षिक साधारण सभा बोलावणे.

६) वार्षिक साधारण सभेत गतवर्षाचा वृत्तांत व हिशेब तपासनिसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मांडणे.

७) परिषदेच्या कार्यासाठी नियमानुसार निधी जमविणे, पत्रव्यवहार पाहणे, करारमदार करणे, जरुरीनुसार समित्या नेमणे.

८) वार्षिक संमेलनाची/साधारण सभेची पूर्वतयारी करणे व सर्व व्यवस्था पाहणे.

९) परिषदेच्या मालमत्तेची व्यवस्था पाहणे.

१०) बँकामध्ये परिषदेच्या नावे खाती उघडून व तत्संबंधी योग्य ठराव वेळोवेळी करून योग्य त्या व्यक्तीला खाती चालविण्याविषयीचे अधिकार देणे.

११) ११-अ) नियतकालिकांच्या प्रमुख संपादकांची नियुक्ती करणे.

अ-१) प्रमुख संपादकांची मुदत तीन (३) वर्षांची राहील.

*११-आ)प्रमुख संपादकांच्या शिफारशीनुसार संपादन सल्लागार मंडळाची* नियुक्ती करणे, त्यांची पुनर्रचना करणे, त्याची मुदत ठरविणे वा ते विसर्जित करणे.संपादन सल्लागार मंडळाच्या सदस्यांची मुदत तीन वर्षे राहील.

१२) परिषदेच्या कामकाजासाठी सेवकवर्ग नियुक्त करणे, त्यांचे वेतन आणि सेवाशर्ती ठरविणे, तसेच त्यांना सेवामुक्त करणे.

१३) परिषदेच्या उद्दिष्टांशी सुसंगत व पोषक असे अन्य कार्य करणे.

**कलम ७: विश्वस्त**

१) साधारण सभा तीन सदस्यांची परिषदेचे विश्वस्त म्हणून निवड करील.

२) विश्वस्तांची निवड तीन वर्षासाठी असेल.

३) परिषदेची स्थावर जंगम मालमत्ता व निकाय निधी (Corpus Fund) याची कायदेशीर जबाबदारी विश्वस्तांवर राहील.

४) परिषदेच्या मालमत्तेची खरेदी आणि विक्री व मालमत्ताविषयक अन्य व्यवहार विश्वस्तांच्या बहुमताच्या निर्णयानुसार होईल.

५) परिषदेचे कार्य संस्थापन समयलेखानुसार होत राहील याची जबाबदारी विश्वस्तांवर राहील.

**कलम ८: अधिमंडळ व साधारण सभा**

**(General Body and General Meeting)**

१) परिषदेचे वर्ष संपल्यापासून किमान एक महिन्यानंतर पण आठ महिन्यांच्या आत परिषदेची वार्षिक साधारण सभा कार्यकारी मंडळाकडून बोलावली जाईल.

२) अध्यक्षांना वा कार्यकारी मंडळाला आवश्यक वाटल्यास किंवा परिषदेच्या किमान पंचाहत्तर सदस्यांनी लेखी मागणी केल्यास तशी मागणी कार्यालयाकडे आल्यापासून दोन महिन्यांच्या आत कार्यकारी मंढळ विशेष साधारण सभा बोलावील.

मराठी अर्थशास्त्र परिषद

३) साधारण सभेची/विशेष साधारण सभेची अधिसूचना व तिची कार्यक्रम पत्रिका किमान पंधरा दिवसांच्या पूर्वसूचनेने सर्व सदस्यांना त्यांच्या नोंदलेल्या पत्त्यावर प्रेषण प्रमाणपत्राने (Certificate of Posting) पाठविली जाईल. याबरोबरच वार्षिक वृत्तांत, ताळेबंद व आगामी वर्षाचे अंदाजपत्रक पाठविण्यात येईल. अशारितीने पाठविलेली अधिसूचना, कार्यक्रम पत्रिका इत्यादी कोण्या सदस्यास न मिळाल्याने या सभेने घेतलेले निर्णय नियमबाह्य ठरणार नाहीत.

४) साधारण सभेची/विशेष साधारण सभेची गणसंख्या पन्नास राहील. गणसंख्येअभावी वार्षिक साधारण सभा पंधरा मिनिटे स्थगित होऊन त्याच ठिकाणी भरेल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. विशेष साधारण सभा. गणसंख्ये अभावी रद्द होईल.

५) परिषदेचे अध्यक्ष साधारण सभेचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या अनुपस्थितीत परिषदेचे कार्याध्यक्ष अध्यक्षपद स्वीकारतील. कार्याध्यक्षही उपस्थित नसतील तर साधारण सभा उपस्थित सदस्यांमधून आपला अध्यक्ष निवडील.

६) सर्व निर्णय सभा सरळ मताधिक्याने घेईल. अध्यक्ष अवश्य तेव्हाच आपले निर्णायक मत वापरतील.

७) वार्षिक वृत्तांत, ताळेबंद, आयव्ययपत्र यासंबंधीचे व साधारण सभेत विचारावयाचे अन्य प्रश्न सदस्यांनी परिषदेच्या कार्यालयाकडे किमान पाच दिवस आधी पाठवावे लागतील.

**कलम ९: वार्षिक साधारण सभा : अधिकार**

**वार्षिक साधारण सभेला पुढील अधिकार असतील -**

१) मागील वर्षाचे इतिवृत्त, वार्षिक वृत्तांत, आयव्ययपत्र, ताळेबंद, लेखापरीक्षकाचा अहवाल व आगामी वर्षासाठीचे अंदाजपत्रक, स्वीकारणे व मंजूर करणे.

२) लेखापरीक्षकाच्या अहवालावर प्रस्ताव करणे.

३) पुढील वर्षासाठी अध्यक्षांची निवड करणे.

४) पुढील वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.

५) दर तीन वर्षांनी कार्याध्यक्ष, कार्यवाह- खजिनदार व दरवर्षी कार्यकारी मंडळाच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी सदस्यांची निवड करणे.

६) आवश्यक तर घटनादुरूस्ती करणे.

**कलम १०: निवडणुका**

१) अध्यक्षाची निवडणूक दरवर्षी होईल.

२) कार्याध्यक्ष आणि कार्यवाह - खजिनदार यांची निवडणूक दर तीन वर्षांनी होईल.

३) कार्यकारी मंडळाच्या तीन सदस्यांची निवडणूक दरवर्षी होईल. राजीनामा वा अन्य कारणाने रिकाम्या होणाऱ्या/राहणाऱ्या जागा कार्यकारी मंडळ सदस्य स्वीकृत करून भरून काढील.

४) निवडणुकीसाठी उभी राहणारी व्यक्ती वार्षिक साधारण सभेपूर्वी किमान दोन वर्षे आधी परिषदेची आजीव सभासद असावी. निवडणुकीसाठी मतदान करणारी व्यक्ती वार्षिक साधारण सभेपूर्वी किमान दोन वर्षे आधी परिषदेची आजीव सभासद असावी. सूचक व अनुमोदक हे परिषदेचे सदस्य असले पाहिजेत.

५) सूचक आणि अनुमोदकांच्या स्वाक्षऱ्यासहित उमेदवारीसाठीचा अर्ज परिषदेच्या कार्यवाह- खजिनदारांकडे वार्षिक साधारण सभेस आरंभ होण्यापूर्वी किमान एक दिवस अगोदर पोहोचला पाहिजे. उमेदवारीच्या अर्जाची संख्या एकूण जागांपेक्षा कमी असल्यास उर्वरित रिकाम्या जागांसाठी उमेदवारांची निवड वार्षिक साधारण सभेतच नावे सुचवून करता येईल. सर्व उमेदवारांचे सूचक व अनुमोदक हे परिषदेचे सदस्य असले पाहिजेत.

६) मतदान हस्तप्रदर्शनाने होईल. परंतु कोणाही सदस्याने मागणी केल्यास अध्यक्षांच्या अनुमतीने मतदान गुप्त पद्धतीने होईल.

७) निवडणुकीची व्यवस्था अध्यक्ष आपल्या अखत्यारीत जरूर पडल्यास काही सदस्यांच्या साहाय्याने पार पाडतील.

**अ) कार्यकारी मंडळावरील अकरा निर्वाचित सदस्यांची निवड गटवार पद्धतीने होईल. त्यासाठीचे गट व सदस्यसंख्या पुढील प्रमाणे -**

| गट | विद्यापीठ | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | पुणे विद्यापीठ | १ |
| २ | मुंबई विद्यापीठ | १ |
| ३ | शिवाजी विद्यापीठ | १ |
| ४ | नागपूर विद्यापीठ | १ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | १ |
| ६ | अमरावती विद्यापीठ | १ |
| ७ | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ | १ |
| ८ | स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ | १ |
| ९ | सोलापूर विद्यापीठ | १ |
| १० | *श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ* | १ |
| ११ | गट १ ते १० ही विद्यापीठे वगळता इतर विद्यापीठ क्षेत्रातील सदस्य | १ |

मराठी अर्थशास्त्र परिषद ★ रजि. ४०१५ ★

टिप - १) गट म्हणजे एखाद्या विद्यापीठाच्या अधिकार क्षेत्रामध्ये ज्या सदस्यांचे वास्तव्य आहे ते त्या गटामध्ये समाविष्ट होतील.

२) त्या त्या गटामधील सदस्यांनाच कार्यकारी मंडळावरील जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येईल.

३) प्रत्येक वर्षी ज्या गटातून सदस्य निवृत्त होतील त्याच गटातून नवीन सदस्यांची निवड केली जाईल.

४) ज्या गटात उमेदवारांची संख्या निवडावयाच्या उमेदवारांच्या संख्येपेक्षा अधिक असेल त्या गटासाठीची निवड मतदान पद्धतीने करण्यात येईल. परिषदेचे अध्यक्ष ही प्रक्रिया पूर्ण करतील आणि निवड जाहीर करतील.

**कलम ११: घटना दुरूस्ती**

१) परिषदेचे नाव किंवा उद्देश या व्यतिरिक्त घटनेत अन्य बदल करण्याचा अधिकार साधारण सभेला राहील. घटना दुरूस्तीसंबधी अधिसूचना कार्यवाह- खजिनदाराकडे साधारण सभेच्या बैठकीआधी किमान तीन महिने आली पाहिजे. अन्यथा उशिरा आलेल्या सूचनेवर साधारण सभेत विचार केला जाणार नाही.

२) घटना दुरूस्तीचा ठराव उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मताधिक्याने मंजूर व्हावा लागेल.

३) परिषदेचे नाव किंवा उद्देश बदलण्यासाठी तद्विषयक अधिसूचना सोसायटीज् रजिस्ट्रेशन कायद्यानुसार संमत व्हावी लागेल.

**कलम १२: परिषदेचे विसर्जन**

सोसायटीज् रजिस्ट्रेशन कायद्यातील तरतुदीनुसार विसर्जनाची सूचना संमत झाल्यास परिषदेचे विसर्जन होईल.